प्रेस नोट दिनांक ०८/०७/२०१९

स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

**हरवलेला मोबाईल परत दिले बाबत**

दि.०६/०७/२०१९ रोजी अविनाश चिनप्पा फुलारी, रा.देशमुख गल्ली, स्वामी समर्थ महाराज मंदीर शेजारी, अक्कलकोट, सोलापुर हे स्वारगेट एस टी स्टॅण्ड येथुन साय १७.०० वा अर्नाळा तुळजापुर या एसटी बसमध्ये अक्कलकोट येथे जाणेकरीता बसले होते. परंतु शेजारीच अक्कलकोट गाडी लागल्याने ते सदर एसटी बसमधुन उतरुन शेजारील अक्कलकोटला जाणारे एसटी बसमध्ये बसले. थोड्या वेळाने त्यांना त्यांचा रेडमी नोट ४ मोबाईल अर्नाळा तुळजापुर यागाडीत विसरल्याचे लक्षात आले. त्यामुळे ते सदर एसटी बस बघण्यास गेले असता, सदरची गाडी निघुन गेली होती. त्यानंतर ते स्वारगेट पोलीस स्टेशन येथे येऊन पोउपनिरी कदम यांना भेटले. पोउपनिरी कदम यांनी पोलीस नाईक ४७८३ खोमणे यांना बोलावुन सदरची माहिती दिली. त्यावर पोलीस नाईक खोमणे यांनी सदर बसचे वाहक यांचेशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की मला गाडीत मोबाईल मिळालेला नाही. परंतु सदर बसचा चालक बदलला असुन, मुळ चालक हा स्वारगेट एस टी स्टॅण्ड येथे आहे. पोलीस नाईक ४७८३ खोमणे यांनी त्याचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्याचेशी संपर्क साधला असता, त्याने रेडमी नोट ४ हा बसमध्ये सापडला असुन तो माझेकडे आहे. पोलीस नाईक खोमणे यांनी अविनाश चिनप्पा फुलारी यांचा रेडमी नोट ४ मोबाईल सदर बस चालक नामे पवार याचे कडुन घेऊन फुलारी यांना परत केला.

अविनाश चिनप्पा फुलारी, यांनी पोलीसांचे आभार मानले.

